# धर्मसंस्था

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये कुटुंबाप्रमाणेच धर्म संस्था ही एक महत्वपूर्ण संस्था आहे.धर्म संस्थेमध्ये मानवी मूल्य शिकवले जातात आधुनिक युगामध्ये विज्ञानाने प्रगती केलेली आहे तरीसुद्धा धर्म संस्थेचे महत्त्व कमी झालेले नाही. धर्मसंस्था ही प्राचीन कालखंडापासून उदयास आलेली एक महत्वपूर्ण संस्था आहे.धर्म संस्थेमध्ये ईश्वर पाप-पुण्य,पवित्र-अपवित्र या संकल्पना खूप महत्वपूर्ण मानल्या जातात.

## धर्म संस्थेचा अर्थ

* धर्म या शब्दाची उत्पत्ती धृ या धातूपासून झाली या धातूचा अर्थ धारण करणे किंवा प्राप्त करणे असा होतो.
* धर्माच्या संदर्भामध्ये देवाचे अस्तित्व मान्य केले जाते.
* व्यक्तीने आपले जीवन नियंत्रण व स्वैराचार पासून दूर ठेवावे असा धर्माचा अर्थ मान्य केला जातो.
* धर्मसंस्था ही समाजातील मूलभूत सामाजिक संस्थेपेकीं एक महत्वपूर्ण संस्था मानली जाते.
* एडवर्ड टायलर या विचारवंतांनी Primitive Culture या ग्रंथामध्ये धर्म विषयक विचार मांडले आहेत.

## धर्म संस्थेच्या व्याख्या

* एडवर्ड टायलर:-
अलौकिक शक्तीवरील विश्वास म्हणजे धर्म होय.
* इमाईल दुरखींम:-
धर्म म्हणजे पवित्र वस्तूशी सबंधित विश्वास आणि अचरणाची व्यवस्था होय.

## धर्म संस्थेचे स्वरूप

* अलौकिक शक्ती:-
अलौकिक शक्ती ही अमूर्त स्वरूपात असते. ही शक्ती सर्वसामान्य व्यक्तीला दिसतं नाही. ही शक्ती पाहण्यासाठी सहावे इंद्राय असावे लागते.

*प्रतिके:-
प्रत्येक धर्माची वेगवेगळी प्रतीके असतात. देवावरील विश्वास व्यक्त करण्यासाठी ज्या साधनांचा वापर केला जातो त्याला प्रतीके म्हणतात.

पवित्र-अपवित्रतेची संकल्पना:-

* पवित्र-अपवित्रता ही संकल्पना धर्माशी संबधी आहे.
* ईश्वराच्या प्रार्थनेसाठी ज्या साधनांचा वापर केला जातो त्या सर्व वस्तू पवित्र असतात.
* पवित्र व अपवित्रता हा भेद मानवाने केला आहे
* जीवनात अत्यंत आवश्यक वस्तुंना पवित्र मानले जाते.

श्रद्धा विश्वास व विधी:-
धर्मावर श्रद्धा व्यक्त करण्यासाठी धार्मिक विधी केल्या जातात.धार्मिक विधी करण्यासाठी विविध साधनांचा वापर केला जातो.उदा. कापूर, तेल,वात, अगरबत्ती,फुले, फळे इ.

*तत्वज्ञान:-
प्रत्येक धर्माचे तत्वज्ञान असते.तत्वज्ञानाशिवाय धर्माचा उदय होऊ शकत नाही.
तत्वज्ञानाशिवाय जीवन जगण्यास योग्य मार्गदर्शन मिळतं नाही.प्रत्येक धर्मास तत्वज्ञानाची चौकट असते .त्याचे पालन प्रत्येक अनुयायांनी करावे अशी अपेक्षा असते.

* मोक्ष:-

* मोक्ष म्हणजे जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून सुटका होय. ही संकल्पना सर्वच धर्मामध्ये दिसून येत.प्रत्येक जण मोक्ष मिळविण्यासाठी विविध धार्मिक विधी करत असतो.संसारातून माया-मोह यापासून दूर जाणे म्हणजे मोक्ष मिळवणे होय.हिंदू धर्मात- मोक्ष,इस्लाममध्ये-कायमत -का- ख्रिश्चन धर्मा मध्ये सलवेशन या संकल्पना वापरतात.

* सर्वत्रीकता:-

प्रारंभी काळापासून आजच्या वैज्ञानिक युगात मध्ये सुद्धा सर्वत्र धर्माचे अस्तित्व कायम असलेले दिसून येते.लू-टॅरिष यांच्या अहवालानुसार अमेरिकेमध्ये 97 टक्के लोक देव मानतात तर आदिवासी लोक हे निसर्गाची पूजा करून देवाचे

## धर्म संस्थेचे सकारात्मक परिणाम

* समाजकल्याण:-

* समाजकल्याण करणे हे धर्माचे संस्थेचे महत्वपूर्ण उद्दिष्ट आहे.

* जनसेवा हीच ईश्वर सेवा मानली जाते.

* प्रत्येक धर्म मदत, सहकार्य , दानधर्म करण्यास सांगितले जाते.

* सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा धर्म संस्था शिकवते.

* सामाजिक नियंत्रण

* धर्म संस्था ही व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्य करते.

* वाईट वर्तन स्वैराचार यांपासून धर्म संस्था व्यक्तीला दूर ठेवते

* पाप-पुण्य,स्वर्ग-नरक या बरोबरच वाईट वर्तनापासून धर्म संस्था व्यक्तीवर नियंत्रण ठेवते.

* सामाजिक एकता:-

*आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत ही भावना निर्माण केली जाते

* सण समारंभ,पुण्यतिथी, जयंती एकत्र साजरी करून एकात्मता निर्माण होते.

* ताण-तणावाचे नियंत्रण

* धर्म संस्थेच्या माध्यमातून ताण तणाव कमी होतो.

* मानवी जीवनातील दुःख दूर करण्यासाठी धर्म संस्था कार्य करते त्यामुळे व्यक्तीला येणारा ताण कमी होण्यासाठी मदत होते

* मनःशांती:-

* अनेक धार्मिक विधी केल्यामुळेच व्यक्तीला मनःशांती मिळते.

* मंदिरात जाऊन प्रार्थना करणे , पवित्र स्थळाना भेट देणे , धार्मिक ग्रंथ वाचून शुध्द मनःशांती मिळत असते.

* मनःशांती मळीवीण्याचा हा सर्वात सोपा मार्ग समजला जातो

* सदवर्तन :-

* समाजामध्ये आपले वर्तन कसे असावे हे धर्म संस्था शिकवत आते.

* चागले-वाईत, पाप-पुण्य इत्यादी संकल्पना धर्म संस्थेच्या माध्यमातून शिकवले जधते.

* धर्म संस्थेच्या माध्यमातून जन्मापासून ते मृत्यू पर्यंत लढण्याची शक्ती व मार्गदर्शन मिळते.

* मानवी मूल्याची शिकवण दिली जाते:-

* धर्म संस्था समता, बाधुता, सहिष्णुता,लोकशाही धर्मनिरपेक्षता

मूल्याची शिकवण धर्म संस्था देतं असते..

*दुःखाचे सांत्वन केले जाते:-

* धर्मसंस्थेच्या माध्यमातून दुःखावर नियंत्रण केले जाते. विविध धार्मिक ग्रांथातून दुःखावर विजय मिळवला जातो.

* बोद्ध धर्मामध्ये आठ आर्य सत्य सांगितले आहे यामध्ये प्रामुख्याने दुःखावर विजय मिळवला जातो.

* मनोधैर्य:-

* धर्म संस्थेच्या माध्यमातून धार्मिक संस्कार केले जातात.

* मानवावर जेव्हा जेव्हा संकटे येतात तेव्हा देवाची आठवण करुन नामस्मरण केले जाते आणि मनोधैर्य वाढले जाते.

* आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी देवाची पूजा केली जाते आणि त्यातूनच समाधान निर्माण होते.

## धर्म संस्थेचे नकारात्मक परिणाम

*** अंधश्रद्धा:-**

* भारतीय संस्कृतीत अंधश्रद्धावर विश्वास ठेवणारा मोठा वर्ग आहे.

* धर्म ही अफूची गोळी आहे- कार्ल मॅक्स

*** धार्मिक कंठरता:-**

* प्रत्येक धर्म स्वतःच्या धर्माला श्रेष्ठ समजतात

* धार्मिक तेड निर्माण केले जाते

*** प्रयत्नवादास मारक:-**

* ठेवली अनंत तैसेची व्हावे चित्ती असू घ्यावे समाधान.

* दैववादी भावानेचा विकास होतो

*** सामाजिक परिवर्तनास विरोध:**

*धार्मिक विधी, परंपरा, संस्कृती, रूढी इ पालन केले जाते

* वैज्ञानिक विचार लक्षात न घेता समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी विरोध केला जातो..

*** सामाजिक विघटन घडून येते:-**

* माझा धर्म हा सर्वश्रेष्ठ आहे की भावना प्रत्येक व्यक्ती मानतो.

* धार्मिक भावना दुखावल्या जातील असे कृत्य इतर धर्माच्या लोकांकडू केले जाते.

*** अमानवीय कृत्य:-**

* पशुबळी, नरबळी, परक्या धर्मियांना गुलाम बनवणे.

* सती प्रथा पालन करणे, पुनर्विवाहाला मान्यता न देणे.

## धर्मनिरपेक्षता

* धर्मनिरपेक्षता या शब्दाचा उदय 19 व्या शतकात झाला.

* धर्मनिरपेक्षता हा शब्द सर्व प्रथम इंग्लंड मध्ये वापरला गेला.

* जार्ज जेकब या ही संकल्पना 1846 मध्ये सर्वप्रथम वापरली.

* सामाजिक क्षेत्रात धर्माची असलेली ताठरता कमी करणे हा उद्देश होता.

* धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्वधर्मसमभाव / सर्व धर्म विषयक समानतेची भावना होय.

* धर्मनिरपेक्षता म्हणजे कोणत्याही एक धर्माचा स्वीकार न करता समानतेची वागणूक देणे होय.

* कोणताही धर्म हा राष्ट्रीय धर्म नाही.

* भारतामध्ये या धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा स्वीकार 1976 मध्ये 42 व्या घटनादुरुस्ती करून राज्यघटनेत समावेश केला आहे.

* राज्यासाठी सर्व धर्म समान आहेत.

* भारतीय राज्यघटनेत कोणत्याही धर्माला विशेष महत्त्व दिले गेले नाही.

* धर्म ही वैयक्तिक ...

## धर्म निरपेक्षता व्याख्या:-

* व्यकट रमण:-"धर्म निरपेक्षत राज्य जसे धार्मिक नाही तसेच ते धर्म विरोधी नाही.कोणत्याही धार्मिक संबंधात राज्य हस्तक्षेप करणार नाही".

## धर्मनिरपेक्ष यामध्ये खालील मुद्दे अपेक्षित आहेत

1.कोणत्याही राज्याचा स्वतंत्र धर्म नाही.

2.सरकार कोणत्याही धर्मास आर्थिक मदत करणार नाही.

3.धर्माचे पालन स्वेच्छेने केले जाते.

4.शासकीय योजनेसाठी कोणत्याही धर्माचा हस्तक्षेप चालणार नाही.

5.धर्माचा वापर धार्मिक अंधश्रद्धा आणि धर्मांधता यासाठी करता येणार नाही.

6.धर्माचा वापर करून पोषण आहार व वैयक्तिक वर्तनावर निर्बंध आणता येणार नाहीत